वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ "अवलंबित्व" ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारण्याबाबत....
शासकीय कर्मचाऱ्यांचे आईवडील आणि अविवाहीत व घटस्फोटीत स्त्रीयांसंदर्भात

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.२८०/९९/आ.३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २० फेब्रुवारी, २००३

**वाचा :-** १) शा.नि. सा.आ.वि.क्र.एमएजी १०९२/६३४/प्र.क्र.६५/आ.७, दि.२१.८.९२
२) शा.नि.सा.आ.वि.क्र.एमएजी १०९९/प्र.क.२८०/आ.३, दि.१८ ऑगस्ट, १९९९

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यसेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम २(३) अन्वये वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबाची व्याख्या विहित करण्यात आली आहे. या व्याख्येत वरील (१) येथील आदेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार, सद्यस्थितीला वरील (२) येथील आदेशान्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्त आईवडीलांचे मूळ निवृत्तीवेतन वा दरमहा कमाल उत्पन्न रु.५००/- पर्यंत असल्यास ते शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबित आहेत असे समजण्यात येते आणि त्यांच्या आजारपणावरील उपचारांच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय ठरते.

पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यात आल्यानंतर वरील मूळ निवृत्तीवेतन वा दरमहा कमाल उत्पन्नाची मर्यादा सुधारण्याचा तसेच कुटुंबाच्या व्याख्येसंदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांचे निराकरण करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन या संदर्भात आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या आईवडीलांना (i) निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा, (ii) निवृत्तीवेतन मिळत नसले तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा, (iii) निवृत्तीवेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांना सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा रु.१,५००/- इतके मूळ निवृत्तीवेतन

घेणाऱ्या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रु.१,५००/- अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबित असल्याचे मानले जाईल.

ब) वरील तरतुद शासकीय कर्मचाऱ्याच्या अविवाहीत बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्याच्यावरील अवलंबित्व ठरवितांना तसेच महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिच्या आईवडिलांऐवजी सासू-सासऱ्यांची निवड केली असेल तर अशाप्रकरणी सासू-सासऱ्यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितांनाही लागु असेल.

३. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागु असतील.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४२५/सेवा-५, दिनांक २१.१२.२००२ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(भ. ज. महाले)

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव